स्थापना : १/१०/१९२१ नोंदणी क्र. : ३६३३

# राजापूर अर्बन

## को-ऑप.बँक लि.,राजापूर (रत्नागिरी)

Small Steps To Bright Future

शताब्दी १०० महोत्सव

१९२१-२०२०

कोरोना व निसर्ग चक्री वादळ यावर मात करुन
स्वच्छ व पारदर्शक कारभाराची



व्या वर्षात उत्तुंग भरारी...!

headoffice@rajapururbanbank.com
www.rajapururbanbank.com

## ९९ वा वार्षिक अहवाल सन २०१९-२०



श्री.जयंत ह.अभ्यंकर
अध्यक्ष

# राजापूर अर्बन को-ऑप. बँक लि.राजापूर

## विद्यमान संचालक मंडळ



श्री.सुनिल भि.जाधव
उपाध्यक्ष



श्री.संजय पां.ओगले
संचालक



श्री.अनिल श्री.करंगुटकर
संचालक



श्री.हनिफ मु.काझी
संचालक



श्री.राजेंद्र श्री.कुशे
संचालक



सौ.अनामिका सौ.जाधव
संचालिका



श्री.अ.रज्जाक अ.अ.डोसानी
संचालक



श्री.विजय श्री.पाध्ये
संचालक



श्री.इब्राहिम ग.बलबले
संचालक



सौ.धनश्री द.मोरे
संचालिका



श्री.प्रसाद ना.मोहरकर
संचालक



श्री.रफिक खु. नेवरेकर
संचालक



श्री.सुरेश द.गवस
तज्ञ संचालक



श्री.ॲड.शशिकांत ग.सुतार
तज्ञ संचालक



श्री.रमेश भै.काळे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री.दिलीप भा.दिवटे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री.शेखरकुमार उ.अहिरे
कार्यकारी संचालक

मुख्य कार्यालय : 'दि रॉयल प्लाझा', पहिला मजला, मुंबई-गोवा हायवे, राजापूर
एस.टी.डेपो समोर, पो.ता.राजापूर, जि.रत्नागिरी, पिन नं.-४१६ ७०२
फोन नं. (०२३५३) २२२४५१, २२२६५१ फॅक्स नं. (०२३५३) २२२८५१ Customer Care No. : 7798326622
• Balance Enquiry Missed Call Dail No.8432601111 •
• Website : rajapururbanbank.com • Email : headoffice@rajapururbanbank.com/rjpurban@yahoo.co.in •

## बँकेचा शाखा विस्तार

| जिल्हा | क्र. | शाखा | स्थापना दिनांक | फोन नंबर |
|---|---|---|---|---|
| रत्नागिरी जिल्हा | १) | राजापूर | ०१/०७/२००२ | ०२३५३-२२२०५१ |
| | २) | साखरी नाटे | १८/०३/१९९७ | ०२३५३-२२५२२१ |
| | ३) | पाचल | ३१/०८/१९९७ | ०२३५३-२२३३२४ |
| | ४) | लांजा | २४/१०/१९९९ | ०२३५१-२३०८५१ |
| | ५) | रत्नागिरी (मारूती मंदिर) | २७/०१/२००२ | ०२३५२-२२७५५१ |
| | ६) | देवरूख | १३/११/२००९ | ०२३५४-२६१८५१ |
| | ७) | जानशी पठार (मिठगवाणे) | २९/११/२०१३ | ०२३५३-२३७६२५ |
| सिंधुदुर्ग जिल्हा | ८) | वैभववाडी | १४/१०/२०१५ | ०२३६७-२३७४५१ |
| | ९) | कुडाळ | १८/०१/२०१७ | ०२३६२-२२४५५१ |
| | १०) | पडेल | २६/०२/२०१७ | ०२३६४-२२५३५१ |

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया लायसन्स : युबीडी-एमएच-६०८ पी दि.२०/१०/१९८६

## • विद्यमान संचालक मंडळ •

| क्र. | संचालकांचे नाव | हुद्दा | मतदार संघ |
|---|---|---|---|
| १ | श्री.जयंत हणमंत अभ्यंकर | अध्यक्ष | सर्वसाधारण - राजापूर तालुक्यातील शाखा |
| २ | श्री.सुनील भिकाजी जाधव | उपाध्यक्ष | अनुसूचित जाती-जमाती |
| ३ | श्री.संजय पांडुरंग ओगले | संचालक | सर्वसाधारण - राजापूर तालुक्यातील शाखा |
| ४ | श्री.अनिलकुमार श्रीधर करंगुटकर | संचालक | इतर मागास प्रवर्ग |
| ५ | श्री.हनिफ मुसा काझी | संचालक | सर्वसाधारण - राजापूर तालुक्यातील शाखा |
| ६ | श्री.राजेंद्र श्रीराम कुशे | संचालक | सर्वसाधारण - राजापूर तालुक्यातील शाखा |
| ७ | सौ.अनामिका सौरभ जाधव | संचालिका | महिला प्रतिनिधी |
| ८ | श्री.अ.रज्जाक अ.अजीज डोसानी | संचालक | सर्वसाधारण - राजापूर तालुक्यातील शाखा |
| ९ | श्री.विजय श्रीराम पाध्ये | संचालक | सर्वसाधारण - राजापूर तालुक्यातील शाखा |
| १० | श्री.इब्राहिम गफार बलबले | संचालक | सर्वसाधारण - राजापूर तालुक्यातील शाखा |
| ११ | सौ.धनश्री दत्ताराम मोरे | संचालिका | महिला प्रतिनिधी |
| १२ | श्री.प्रसाद नारायण मोहरकर | संचालक | भटक्या विमुक्त जाती-जमाती/विशेष मागास प्रवर्ग |
| १३ | श्री.रफिक खुदबुद्दीन नेवरेकर | संचालक | सर्वसाधारण - राजापूर तालुक्याबाहेरील शाखा |
| १४ | श्री.सुरेश दत्ताराम गवस | तज्ञ स्विकृत संचालक | -- |
| १५ | ॲड.श्री.शशिकांत गणपत सुतार | तज्ञ स्विकृत संचालक | -- |
| १६ | श्री.रमेश भैरू काळे | कर्मचारी प्रतिनिधी | -- |
| १७ | श्री.दिलीप भालचंद्र दिवटे | कर्मचारी प्रतिनिधी | -- |
| १८ | श्री.शेखरकुमार उत्तम अहिरे | कार्यकारी संचालक | -- |

❖ आपली बँक आपला अभिमान ! ❖

# नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

सन्माननीय सभासद बंधू व भगिनी,

आपणांस कळविण्यात येते की, राजापूर अर्बन को-ऑप.बँक लि.राजापूर या बँकेची ९९ व्या वार्षिक सर्वसाधारण बैठक **रविवार दि.१४/०२/२०२१ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता 'छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह', राजापूर नगरपरिषद, राजापूर, प्रांत कार्यालय इमारत, पो.ता. राजापूर, जि.रत्नागिरी** या ठिकाणी बँकेचे अध्यक्ष श्री.जयंत हणमंत अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी कृपया सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

## • विषय पत्रिका •

वि.क्र. ०१ : रविवार दि.१५ सप्टेंबर २०१९ रोजी झालेल्या ९८ व्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

वि.क्र. ०२ : सन २०१९-२०२० सालचा अहवाल, ताळेबंद व नफातोटापत्रक स्विकृत करणे.

वि.क्र. ०३ : सन २०१९-२०२० सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चाला मंजूरी देणे.

वि.क्र. ०४ : कायदा व नियम यांस अनुसरून सन २०१९-२० सालचे नफा वाटणीस मान्यता देणे.

वि.क्र. ०५ : सन २०१९-२०२० चा शासकिय लेखापरिक्षक यांचा अहवाल/दोष दुरूस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.

वि.क्र. ०६ : सन २०२०-२०२१ सालचे मा.संचालक मंडळाने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

वि.क्र. ०७ : सन २०२०-२०२१ सालाकरीता वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे.

वि.क्र. ०८ : सन २०२०-२०२१ सालाकरीता कंकरंट/अंतर्गत हिशोब तपासणीसाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

वि.क्र. ०९ : संचालक मंडळाने शिफारस केलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे.

वि.क्र. १० : सभासदांकडून आलेल्या लेखी प्रश्नांची उत्तरे वाचून त्यांची नोंद घेणे.

वि.क्र. ११ : सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत (Condone) करणे.

वि.क्र. १२ : मा.अध्यक्ष महाशय यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे.

संचालक मंडळाचे आदेशावरून

स्थळ : राजापूर

XXX

दिनांक : २९/१२/२०२०

**श्री.शेखरकुमार उत्तम अहिरे**

कार्यकारी संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी

---

टीप १) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरु करण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

२) बँकेच्या कामकाजाबाबत सन्माननिय सभासदांच्या काही सूचना असल्यास त्या त्यांनी लेखी स्वरुपात बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे दि. ०८/०२/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत मिळतील अशा रितीने पाठवाव्यात. बँकेचा वार्षिक ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तसेच अन्य हिशेबी कामकाजाबाबत भागधारक सभासदांना आवश्यक असलेली सर्व तपशिलवार माहिती बँकेच्या प्रधान कार्यालयामध्ये उपलब्ध करून ठेवलेली असून, बँकेच्या कोणाही भागधारक सभासदास कार्यालयीन वेळेत ती पाहता येईल व त्याबाबत काही शंका असल्यास त्याचे त्वरीत निराकरण केले जाईल. सभासदांच्या वैयक्तिक शंकांबाबत त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळून भागधारक सभासदांना सभागृहामध्ये चर्चा करणेसाठी पूर्ण वेळ मिळावा यासाठी अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

३) बँकेचा ९९ वा अहवाल, बँकेचे संकेतस्थळ rajapururbanbank.com वर उपलब्ध असून, तसेच प्रधान कार्यालयासह सर्व शाखांमध्ये नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आलेला असून, वार्षिक अहवालाच्या प्रतीही उपलब्ध करून ठेवलेल्या आहेत.

४) बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस येतांना अहवालाची प्रत, सभासद ओळखपत्र अथवा फोटोसहित ओळखपत्र आणणे अत्यावश्यक आहे.

❖ ठेवींना डिपॉझिट इन्श्युरन्स क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन मार्फत ५ लाखांपर्यंत विमा संरक्षण प्राप्त ❖

# परिशिष्ट "अ"

१) बँकेचे नाव :- राजापूर अर्बन को-ऑप.बँक लि.राजापूर (रत्नागिरी)

२) बँकेचा पत्ता :- मुख्य कार्यालय : 'दि रॉयल प्लाझा', पहिला मजला, मुंबई-गोवा हायवे, राजापूर एस.टी.डेपो समोर,पो.ता.राजापूर, जि.रत्नागिरी : ४१६ ७०२

३) बँकेची नोंदणी तारीख व नंबर :- रजि.नं.३६३३, दि.०१/१०/१९२१

४) रिझर्व्ह बँकेकडून मिळालेला परवाना नंबर व तारीख :- UBD/MH-608 P दिनांक २०-१०-१९८६

५) कार्यक्षेत्र :- संपूर्ण महाराष्ट्र राज्य

## • ३१ मार्च २०२० ची आर्थिक स्थिती •

(रूपये लाखात)

| अ.क्र. | तपशील | | | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | शाखांची संख्या - मुख्य कार्यालयासहित | | १० + १ = ११ | |
| २ | सभासद संख्या - | कायम | २३,६२१ | |
| | | नाममात्र | ३,९२२ | |
| ३ | भांडवल - | अधिकृत | | १,000.00 |
| | | वसूल | | ५९२.८३ |
| ४ | निधी राखीव व इतर | | | १,३६५.00 |
| ५ | ठेवी | | | २४,४७८.४९ |
| | | बचत ठेवी | ५,४२९.८६ | |
| | | चालू ठेवी | २९६.३६ | |
| | | मुदत ठेवी | १८,०५४.०८ | |
| | | इतर ठेवी | ६९८.१९ | |
| ६ | कर्जे | | | १५,०२५.५६ |
| | | तारण युक्त | १४,८२६.४२ | |
| | | विनातारण | १९९.१४ | |
| | | थकबाकी प्रमाण | १.५४% | |
| | अग्रक्रम कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण | | ६८.४५% | |
| | दुर्बल घटकाचे एकूण कर्जाशी प्रमाण | | ४०.४२% | |
| ७ | गुंतवणूक | | | ९५५२.८० |
| | चालू वर्षाचा नफा | | | २०१.७३ |
| | ऑडिट वर्ग | | "अ" | |
| | एकूण कर्मचारी वर्ग - अधिकारी वर्ग | | १५ | |
| | इतर | | ३२ | ४७ |
| ८ | बाहेरील कर्जे | | | 0.00 |
| ९ | खेळते भांडवल | | | २७,०५९.३५ |

# सभासदांचे माहितीसाठी

रिझर्व्ह बँक परिपत्रक DCBR.LS.(PCB)MC.NO.16 दिनांक ०१ जुलै २०१५ अन्वये खालील कसोटीस (Criteria) पात्र असणाऱ्या बँकांना Financially Sound and Well Managed (FSWM) Urban Co-Op. Bank's (UCBs) असे संबोधणेत येईल व अशा बँकांना नविन शाखा उघडणे, ATM सेंटर सुरू करणे, कार्यक्षेत्र वाढवून देणे तसेच रिझर्व्ह बँकेकडून घ्याव्या लागणाऱ्या अन्य परवानग्या दिल्या जातील असेही परिपत्रकात नमूद आहे. या परिपत्रकाप्रमाणे बँकेची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| No. | Criteria for FSWM UCBs | Bank's Position As on 31.03.2020 |
|---|---|---|
| A | CRAR of not less than 10 percent; | Bank is maintaining CRAR more than 10% on a continuous basis Current CRAR is **13.33%** |
| B | Gross NPA of less than 7% and<br>Net NPA of not more than 3% | **1.46%**<br>**0.00%** |
| C | Net profit for at least three out of the preceding four years subject to it not having incurred a net loss in the immediate preceding year. | Yes Net Profit for the year 2017-18 Rs.80.72 Lakh, Net Profit for the year 2018-19 Rs.126.89 Lakh, Net Profit for the year 2019-20 Rs.201.73 Lakh |
| D | No default in the maintenance of CRR/SLR during the preceding financial year | No default in CRR/SLR |
| E | Sound internal control system with at least Two professional directors on the Board | Yes -<br>2 Professional directors are on Board |
| F | Core Banking Solution (CBS) fully implemented; and | Yes |
| G | Regulatory comfort based on, inter alia, record of compliance to the provisions of Banking Regulation Act, 1949 (AACS), Reserve Bank of India Act, 1934 and the instructions/directions issued by RBI from time to time i.e. the bank should have track record of regulatory compliance and no monetary penalty should have been imposed on the bank on account of violation of RBI directives/guidelines during the last two financial years (Ref : DCBR. CO.LS (PCB) Cir.No.4 dated 28/01/2015) | Yes |

The Urban Co-op. Banks, which fulfill the above stated seven norms are called "Financially Sound and Well Managed (FSWM)" UCBs.

# ९९ वा वार्षिक अहवाल सन २०२०

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

बँकेच्या संचालक मंडळाच्यावतीने आणि प्रशासनाच्यावतीने आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करीत आहे. आपल्या बँकेच्या ९९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने मा.अंतर्गत आणि मा.वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केलेले आर्थिक वर्ष सन २०१९-२० चे दि. ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

बाजारात कोरोना विषाणूच्या वाढत्या संसर्गामुळे जागतिक अर्थव्यवस्था अडचणीत येत असताना मंदीच्या लाटेतून अनेक आव्हाने, बँकिंग स्पर्धा, ताण-तणाव यांना सामोरे जात अतिशय बिकट परिस्थितीतही आपल्या बँकेने दूरदृष्टीने नियोजन करून ग्राहक हा केंद्रबिंदू मानून त्यांना आवश्यक असणाऱ्या सेवा-सुविधा वेळोवेळी अद्ययावत स्वरुपाच्या देऊ केल्याने रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन करत बँकेने कर्ज वितरण व ठेव संकलन करून बाजारात असलेल्या प्राप्त परिस्थितीतही समाधानकारक असा व्यवसाय करून दि. ३१ मार्च २०२० अखेर बँकेचा एकूण मिश्र व्यवसाय ३९५.०४ कोटी इतका करण्यात बँकेला यश प्राप्त झाले आहे.

देशातील जवळपास सर्वच राज्यात लॉक-डाऊन आणि अनेक निर्बंध लादल्याने सर्वच व्यवहार बंद पडलेले आहेत. अशाही स्थितीत कोलमडून पडत असलेली अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी बँकेने नियोजनबद्ध प्रयत्न केल्याने अल्प असली तरी समाधानकारक प्रगती केली आहे. बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाने कायमस्वरूपी उत्कर्षाचा घेतलेला ध्यास व आधुनिक तंत्रप्रणालीची धरलेली कास यामुळे आर्थिक वर्षात उत्तम कामगिरीसाठी बँकेला सहकारी बँक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या 'बँको' या सहकारी बँक संदर्भ ग्रंथ संस्थेकडून सलग सातव्या वर्षी'बँको' पुरस्कार आणि टेक्नॉलॉजी ॲवॉर्ड प्राप्त झाले आहेत. 'कर्नाडस् बँकिंग रिसर्च अँड डेव्हल्पमेंट फाऊंडेशन, कोल्हापूर' या संस्थेकडून 'सर्वोत्तम मुख्य कार्यकारी अधिकारी' म्हणून श्री.शेखरकुमार अहिरे व 'सर्वोत्तम विशेष वसुली अधिकारी'म्हणून श्री.रमेश काळे या वैयक्तिक पुरस्कारांसहीत बँकेला तीन सांघीक 'आर्थिक सक्षम आणि उत्तम व्यवस्थापन असणारी बँक', 'शून्य टक्के निव्वळ एन्.पी.ए. असणारी बँक' व 'सर्वोत्तम नागरी सहकारी बँक' असे एकूण पाच पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच 'बँकिंग फ्रंटियर्स' या सहकारी क्षेत्रातील अग्रगण्य संस्थेचा २०१९ चा 'बेस्ट आय.टी. हेड' पुरस्कार बँकेचे संगणक विभाग (आय.टी.) प्रमुख श्री.प्रसन्न खांबे यांना देऊन सन्मानीत केले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन, मुंबई यांच्यावतीने 'कै.बापूरावजी देशमुख उत्कृष्ट सहकारी बँक कर्मचारी' पुरस्काराने बँकचे लिपिक श्री.रोहित सामंत यांना गौरविण्यात आले आहे. असे अनेक पुरस्कार प्राप्त करण्याचा बहुमान बँकेने कायम राखलेला आहे व यापुढेही बँकेची प्रगती कायम उच्च स्तरावर राहील असा विश्वास ही आहे. बँकेची आजवरील आर्थिक स्थिती पाहता रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे. याचा ग्राहकांसह आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे. संचालक मंडळाची दूरदृष्टी, नाविन्यपूर्ण कल्पकता आणि विकासात्मक नेतृत्वाचे मौलीक मार्गदर्शनाखाली बँकेने तळकोकणात बँकिंग क्षेत्रामध्ये आपला वेगळा ठसा उमटवून प्रगतीचा आलेख कायम ठेवला आहे.

अहवाल वर्षात ठेवींमध्ये वाढ होऊन बँकेच्या ठेवी ३१ मार्च २०२० रोजी रु. २४४.७८ कोटी झाल्या आहेत. तर बँकेच्या कर्ज व्यवहारांमध्ये वाढ होऊन दि. ३१ मार्च २०२० अखेर बँकेची एकूण कर्जे रु. १५०.२६ कोटी झालेली आहेत. अतिशय प्रतिकूल

परिस्थितीत स्पर्धात्मक व्यवसाय करत बँकेने आपला नफा वाढ केली आहे. याचाच अर्थ व्यवसायातील पारदर्शकता जपत बँकेने केलेली प्रगती ही नक्कीच नोंदणीय अशीच आहे आणि भविष्यातही ती कायम राहील असा विश्‍वास आहे.

सन्माननीय भागधारकांनी बँकेच्या सक्षमतेवर सातत्याने दर्शविलेल्या विश्‍वासाबद्दल मी आपला आभारी आहे. बँकेच्या ग्राहकांनी बँकेस केलेल्या मौलीक सहकार्याबद्दल तसेच बँकेच्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उद्दिष्टपूर्तीसाठी घेतलेल्या अपार मेहनतीबद्दलही मी त्यांचे आभार मानतो व पुन:श्‍च सर्वांना धन्यवाद देतो.

## सभासद व भागभांडवल

बँकेच्या विकासाच्या प्रक्रियेत सभासदांचा वाढता सहभाग महत्त्वपूर्ण असतो. बँकेच्या विकासाचा कणा म्हणजे सभासद होय. सभासदांचा वाढता विश्‍वास व बँकेच्या व्यवसायातील होत असलेली वाढ यामुळे भविष्यात बँकेच्या भागभांडवलात मोठ्या प्रमाणात वाढ होईल असा आम्हांला विश्‍वास आहे.

या आर्थिक वर्षाअखेर बँकेचे एकूण २३,६२१ सभासद आहेत. त्यात एकूण २४२ इतक्या सभासदांनी राजिनामा दिलेला असून १,११४ इतके नवीन सभासद झालेले आहेत.

## भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR)

कर्जासाठी व अन्य जिंदगीसाठी स्विकारलेली जोखीम व त्यासाठी बँकेचे भाग भांडवल व निधी यावर भांडवल पर्याप्तता ठरविली जाते. रिझर्व्ह बँकेच्या निकषाप्रमाणे, बँकेचे भागभांडवल पर्याप्तता ९% पेक्षा जास्त असावी लागते. अहवाल सालात बँकेने हे प्रमाण १३.३३% इतके राखणेत यश मिळविले आहे. हे बँकेच्या सुस्थितीचे/सुदृढतेचे प्रतिक आहे.

## राखीव व इतर निधी

राखीव व इतर निधीमध्ये गतवर्षीच्या तुलनेत अहवाल वर्षात रु. १६९.०८ लाख वाढ झालेली असून सदर वाढीचे प्रमाण १२.३९ इतके आहे. अहवाल साल अखेर एकूण निधी रु. १,३६५.०० लाख आहे. सदरची वाढ समाधानकारक आहे.

## ठेवी

बँकेकडे असणाऱ्या ठेवींवर बँकेचे स्थैर्य, लौकिक अवलंबून असतो. या बाबींचा सातत्याने विचार व अभ्यास करून आपल्या बँकेच्या सर्व संचालक मंडळ व सभासद तसेच बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी ठेवीत वाढ होण्यासाठी केलेले भरीव प्रयत्न, सभासद, बाहेरील ठेवीदार यांचे उत्स्फूर्तपणे सहकार्य, ठेवीदारांचा बँकेवरील विश्‍वास, ठेव वाढीसाठी बँकांमध्ये स्पर्धा असूनही आपल्या बँकेने ठेव वाढीत सातत्य ठेवलेले आहे.अहवाल वर्षात बँकेच्या एकूण ठेवींमध्ये रु.२५ कोटी २४ लाख ठेव वाढ होऊन बँकेच्या एकूण ठेवी रक्कम रु.२४४ कोटी ७८ लाख इतक्या झाल्या आहेत. बँकेच्या ठेव वाढीचे हे प्रमाण ११.५०% आहे.

ठेवीदारांच्या ठेवीस सुरक्षितता ही बँकींग क्षेत्रातील महत्त्वाची बाब आहे. आपली बँक नियमितपणे ठेव विम्याचे हप्ते हे **डिपॉझिट इन्श्युरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन (DICGC)** यांच्याकडे भरत असून बँकेने ठेवीदारांना रु. ५ लाख पर्यंत विमा संरक्षण प्राप्त करून दिले आहे. बँकेने या वर्षात देय असलेला विमा हप्ता वेळेत भरलेला आहे. विमा पॉलिसी रजिस्टर नंबर MH/155 Code No. 43476 आहे.

## कर्जे

सुरक्षित व उत्पन्नक्षम कर्ज व्यवहारांवर बँकेचे यश बहुतांशी अवलंबून असते आणि त्या करीता उत्तम व्यवस्थापन हा बँकेचा आत्मा आहे. कारण बँकेच्या प्रमुख नफाशिलतेमध्ये उत्तम कर्ज व्यवहारांचा वाटा महत्त्वाचा असतो. कर्ज वितरण व वितरण पश्चात नियंत्रण यामध्ये अमुलाग्र असे बदल व सजगता यामुळे उत्तम दर्जाचा कर्ज व्यवहार बँकेने करण्याचा प्रयत्न राखलेला आहे. आर्थिक वर्षामध्ये बँकेने विशेष लक्ष देऊन व तातडीचे निर्णय घेऊन अनेक सुरक्षित कर्ज व्यवहार केले आहेत. त्यामुळे १९ कोटी ३० लाख

एवढी वाढ झाली असून वर्ष अखेरीस एकूण कर्ज रु. १५० कोटी २६ लाख इतकी आहेत. सदर कर्ज वाढीचे प्रमाण १४.७४% आहे. कर्ज व ठेवींचे उत्तम गुणोत्तर राखण्यात बँकेला यश आले असून, बँकेच्या आर्थिक वर्षाचा सी.डी. रेशो ६१.३८% इतका झालेला असून रिझर्व्ह बँकेच्या धोरणांप्रमाणे ते रास्त योग्य प्रमाणात राखण्यात आलेले आहे. रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार बँकेने कर्ज वाटप केले असून अहवाल सालाअखेर अग्रक्रम क्षेत्रासाठी ६८.४५% तर दुर्बल घटकांसाठी ४०.४२% इतका कर्ज पुरवठा केला आहे.

## संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे

(रुपये लाखात)

| तपशील | संचालक | नातेवाईक | एकूण |
|---|---|---|---|
| वर्षाच्या सुरुवातीला येणे रक्कम | ३०.३८ | ३.९१ | ३४.२९ |
| आर्थिक वर्षात दिलेली रक्कम | ०.५१ | ५.५९ | ६.१० |
| आर्थिक वर्षात फेड केलेली रक्कम | ०.८८ | ०.०० | ०.८८ |
| आर्थिक वर्षात येणे बाकी रक्कम | ३०.०१ | ९.५० | ३९.५१ |
| येणे रक्कमेपैकी थकीत रक्कम | निरंक | निरंक | निरंक |

## गुंतवणूक

अहवाल सालात आपल्या बँकेने बँकिंग नियंत्रण कायदा १९४९ चे कलम १८ व २४ च्या तरतूदीस अधीन राहून वर्षभर रोखता व तरलता जिंदगीचे प्रमाण योग्य राखले असून अहवाल साल अखेर एकूण गुंतवणूक रक्कम रु. ९५ कोटी ५३ लाख आहे. सदरची वाढ ही ८.५५% इतकी झालेली असून ती समाधानकारक आहे.

## अनुत्पादित कर्जव्यवस्थापन

गतवर्षी बँकेची एकूण अनुत्पादक कर्ज रक्कम रु. १५७.४० लाख इतकी होती. बँकेचे एकूण कर्जाचे ढोबळ एन्.पी.ए. प्रमाण १.२०% होते. तसेच निव्वळ एन्.पी.ए.चे प्रमाण ०% होते. चालू वर्षी बँकेची एकूण अनुत्पादक कर्ज रक्कम रु. २१८.७१ लाख इतकी आहे. बँकेच्या एकूण कर्जाचे ढोबळ एन्.पी.ए. प्रमाण १.४६% इतके असून निव्वळ एन्.पी.ए.चे प्रमाण ०% आहे. बँकेने निव्वळ एन्.पी.ए.चे प्रमाण सलग १० वर्ष ०% ठेवलेले आहे. याचा आवर्जुन या ठिकाणी उल्लेख करत आहे.

## शाखानिहाय आर्थिक स्थितीचा आढावा (३१ मार्च २०२० अखेर)

(रक्कम रुपये लाखात)

| अ. क्र. | तपशील | मुख्य कार्यालय | राजापूर शाखा | सा.नाटे शाखा | पाचल शाखा | लांजा शाखा | रत्नागिरी शाखा | देवरूख शाखा | जा.पठार शाखा | वैभववाडी शाखा | कुडाळ शाखा | पडेल शाखा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठेवी | ----- | १०,३५८.७५ | १,५१७.३४ | १,८२७.८८ | ३,२८७.२१ | ३,४३०.९८ | ७९३.७३ | ७८१.४१ | १,४९२.०४ | ६४६.२९ | ३४२.८६ |
| २ | कर्जे | ----- | ३,४९०.८८ | ९३५.७२ | ८११.२६ | १,७०९.०४ | ३,८६८.३९ | ७००.८३ | ४७४.७० | १,६१५.७७ | १,०८५.८५ | ३२५.१२ |
| ३ | उत्पन्न | ----- | १,४३०.९० | ३२३.६० | ४३९.७० | ४१३.२२ | ६१७.४५ | १७८.८५ | ८२.९३ | २७४.२८ | १५६.८३ | ११३.६६ |
| ४ | खर्च | ----- | १,१५८.५४ | २६३.१० | ३८१.१४ | ३४६.८६ | ४५६.०१ | १६८.६३ | ७०.२६ | १९२.७० | ११७.५५ | १०५.६९ |
| ५ | नफा-तोटा | -३३०.९५ | २७२.३६ | ६०.५० | ५८.५६ | ६६.३५ | १६१.४४ | १०.२१ | १२.६७ | ८१.५८ | ३९.२८ | ७.९७ |
| ६ | थकबाकी | ----- | ३४.२१ | २.४० | ८.४६ | २३.७० | १०९.६९ | ३३.५२ | ३.१८ | ६.९८ | ४.७० | ३.९७ |
| ७ | थकबाकी % | ----- | ०.९८ | ०.२६ | १.०३ | १.३९ | २.८४ | ४.७८ | ०.६७ | ०.४३ | ०.४३ | १.२२ |

## बँकेच्या पंचवार्षिक सांपत्तिक स्थितीचा तुलनात्मक आढावा

(रक्कम रुपये लाखात)

| क्र. | तपशील | मार्च २०१६ | मार्च २०१७ | मार्च २०१८ | मार्च २०१९ | मार्च २०२० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कायम सभासद संख्या | १८,८९४ | १९,९५६ | २१,५१२ | २२,७४९ | २३,६२१ |
| २ | नाममात्र सभासद संख्या | ३,५९० | ३,६८५ | ३,०१२ | २,९५७ | ३,९२२ |
| ३ | वसूल भाग भांडवल | २८४.७८ | ३३५.८७ | ४१८.१३ | ५०७.४७ | ५९२,८३ |
| ४ | राखीव व इतर निधी | ८१४.५६ | ९४१.५८ | १,०९२.०२ | १,१९५.९२ | १,३६५.०० |
| ५ | ठेवी | १२,८२८.१६ | १५,५२५.३८ | १८,९६६.४३ | २१,९५४.११ | २४,४७८.४९ |
| ६ | कर्जे | ७,६७९.६१ | ८,८४०.७७ | १०,६७५.६१ | १३,०९५.१७ | १५,०२५.५६ |
| ७ | गुंतवणूक | ४,९४०.८८ | ६,८१६.२१ | ८,४२०.९० | ८,८००.६८ | ९,५५२.८० |
| ८ | सी.डी.रेशो | ५९.८७% | ५६.९४% | ५६.२९% | ५९.६५% | ६१.३८% |
| ९ | थकबाकी | ११३.४६ | १९९.२६ | २२६.३२ | २४४.४४ | २३०.८१ |
| १० | थकबाकी प्रमाण | १.४८% | २.२५% | २.१२% | १.८६% | १.५४% |
| ११ | ढोबळ एन्.पी.ए.% | ०.६५% | १.३३%% | १.१६% | १.२०% | १.४६% |
| १२ | निव्वळ एन्.पी.ए.% | ०.००% | ०.००% | ०.००% | ०.००% | ०.००% |
| १३ | अग्रक्रम क्षेत्रासाठी कर्ज% | ६८.००% | ६९.००% | ७४.२०% | ६९.५०% | ६८.४५% |
| १४ | दुर्बल घटकांसाठी कर्ज% | ३७.१५% | ३८.१५% | ३२.५६% | ३९.००% | ४०.४२% |
| १५ | ढोबळ नफा | ११८.२१ | २३८.८१ | १९२.८८ | २८२.५५ | ४३९.५७ |
| १६ | आयकर पूर्वी नफा | ९७.८२ | १३८.०४ | १०६.१६ | १९०.५५ | ३१०.२३ |
| १७ | निव्वळ नफा | ६८.९५ | १००.२५ | ८०.७२ | १२६.८९ | २०१.७३ |
| १८ | ढोबळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी% | ०.४८% | ०.५८% | ०.३९% | ०.५३% | ०.७५% |
| १९ | कासा डिपॉझिटचे एकूण ठेवीशी% | २५.३३% | २३.८२% | २७.४६% | २९.४७% | २३.४०% |
| २० | कॉस्ट ऑफ डिपॉझिट | ८.३८ | ८.०८ | ७.३५ | ६.९६ | ६.८४ |
| २१ | सी.आर.ए.आर. | १४.१०% | १३.०८% | १३.३०% | १२.६५% | १३.३३% |
| २२ | कर्मचारी संख्या | ४४ | ४३ | ४२ | ४७ | ४७ |
| २३ | प्रति कर्मचारी ठेवी | २९१.५५ | ३६१.०६ | ४५१.५८ | ४६७.१० | ५२०.८२ |
| २४ | प्रति कर्मचारी कर्ज | १७४.५४ | २०५.६० | २५४.१८ | २७८.६२ | ३१९.६९ |
| २५ | प्रति कर्मचारी नफा | १.५७ | २.३३ | १.९२ | २.७० | ४.२९ |
| २६ | प्रति कर्मचारी व्यवसाय | ४६६.०९ | ५६६.६५ | ७०५.७६ | ७४५.७३ | ८४०.५१ |
| २७ | लाभांश | १०% | १०% | १०% | १०% | -- |
| २८ | ऑडिट वर्ग | अ | अ | अ | अ | अ |
| २९ | स्वनिधी | ८०४.६३ | ९५१.५३ | १,१०५.५० | १,३११.३२ | १,५७४.१२ |
| ३० | खेळते भांडवल | १४,२६३.३५ | १७,४३९.८४ | २१,०५६.१८ | २४,१०४.८३ | २७,०५९.३५ |
| ३१ | एकूण व्यवसाय | २०,५०७.७६ | २४,३६६.१५ | २९,६४२.०४ | ३५,०४९.२८ | ३९,५०४.०५ |

## तारण निहाय कर्जाचा तक्ता

(रक्कम रुपये लाखात)

| अ. क्र. | तपशील | येणे कर्ज | | | | एकूण येणे कर्जाशी प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१८-२०१९ | | २०१९-२०२० | | २०१८-१९ | २०१९-२० |
| | | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | रक्कम | रक्कम |
| १ | व्यापारी मालतारण नजरगहाण | १२४ | १,१८०.९४ | १३३ | १,५०९.९४ | ९.०२ | १०.०५ |
| २ | इमारत व प्रॉपर्टी | ५२६ | ५,२८८.९९ | ५८६ | ६,३६१.२९ | ४०.३९ | ४२.३४ |
| ३ | यंत्रसामुग्री | ५१ | २१.३४ | ५१ | ३१.६८ | ०.१६ | ०.२१ |
| ४ | वाहने | १,१५० | २,१४२.८३ | ११३७ | २२५६.५४ | १६.३६ | १५.०२ |
| ५ | सोनेतारण | ११,२६३ | ३,१००.९० | १०५९६ | ३३६९.८६ | २३.६८ | २२.४३ |
| ६ | सरकारी कर्जरोखे | ५ | ५.१० | १ | ०.२२ | ०.०४ | ०.०० |
| ७ | कंपनी शेअर्स/विमा | १२ | ८.९९ | १३ | ७.३३ | ०.०७ | ०.०५ |
| ८ | भाडे खरेदी | २,६४७ | ५७०.६३ | २४०१ | ५५३.७४ | ४.३६ | ३.६८ |
| ९ | ठेव तारण | ५१३ | ७७५.४५ | ६२२ | ९३४.९६ | ५.९२ | ६.२२ |
| | एकूण | १६,२९१ | १३,०९५.१७ | १५५४० | १५०२५.५६ | १००.०० | १००.०० |

## थकबाकीचा तपशील ३१-०३-२०२०

(रक्कम रुपये लाखात)

| मुदत | तारण | | तारणविरहित | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| १ वर्षापर्यंत | ७०५ | १०७.१९ | ६०१ | ३.०० | १३०६ | ११०.१९ |
| १ ते २ वर्ष | ५ | १७.०९ | ३ | ०.४३ | ८ | १७.५२ |
| २ ते ३ वर्ष | ४ | २५.०८ | १ | ०.१४ | ५ | २५.२२ |
| ३ ते ५ वर्ष | ५ | ४४.२४ | ७ | १.२२ | १२ | ४५.४६ |
| ५ वर्षावरील | ११ | २६.३४ | १४ | ६.०८ | २५ | ३२.४२ |
| एकूण | ७३० | २१९.९४ | ६२६ | १०.८७ | १३५६ | २३०.८१ |

## थकबाकीचे वर्गीकरण

| अ.क्र. | मुदत | एकूण थकबाकी रुपये | एकूण थकबाकीचे येणे कर्जाशी प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १ वर्षाचे आतील | १,१०,१८,७४०.०० | ०.७३ |
| २ | १ ते २ वर्ष | १७,५१,६३१.०० | ०.१२ |
| ३ | २ ते ३ वर्ष | २५,२२,५२७.०० | ०.१७ |
| ४ | ३ ते ५ वर्ष | ४५,४५,६०१.०० | ०.३० |
| ५ | ५ वर्षावरील | ३२,४२,५७४.९५ | ०.२२ |
| | एकूण | २,३०,८१,०७३.९५ | १.५४ |

❖ जेष्ठ नागरिकांसाठी घरपोच तसेच फिरती बँक (Tab Banking) सुविधा ❖

दि.३१-०३-२०२० अखेरीस प्रत्येक कर्जाच्या येणेबाकी, त्यातील थकबाकी व तिचे कर्जाशी प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

## (अ) अल्पमुदत कर्जे

| अ.क्र. | कर्जाचा प्रकार | येणे बाकी रुपये | पैकी थकित | शे.प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | कॅश-क्रेडिट जामीन | २४,१५७.७५ | २४,१५७.७५ | ०.०० |
| २ | कॅश-क्रेडिट नजरगहाण | १४,३९,२२,६५२.६७ | ४,६८,८१२.०० | ०.०३ |
| ३ | कॅश-क्रेडिट आंबा | ७०,४६,९०४.६२ | ०.०० | ०.०० |
| ४ | सोनेतारण | २९,९४,११,७३०.०७ | ०.०० | ०.०० |
| | एकूण | ४५,०४,०५,४४५.११ | ४,९२,९६९.७५ | ०.०३ |

## (ब) मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे

| क्र. | कर्जाचा प्रकार | येणे कर्ज रुपये | पैकी थकित रुपये | शे.प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | जामिनतारण (अंडरटेकिंगसह) | १,५२,२६,२३३.०० | ९७,८९६.०० | ०.०१ |
| २ | जा.तारण (ई करारपत्र बोजा) | १,६८,२७,०७८.०० | १,७८,८०७.०० | ०.०१ |
| ३ | जा.तारण-आकस्मिक कर्ज/गृहलक्ष्मी | १,९८,८९,८२३.०० | ६,२३,६९५.५० | ०.०४ |
| ४ | घरबांधणी | २४,८१,५८,७४७.३० | २२,५०,७११.५० | ०.१५ |
| ५ | स्थावर तारण | ३८,७९,७०,४९८.७२ | १,५६,७०,०६९.२० | १.०४ |
| ६ | वाहन तारण | २२,५६,५३,६४८.६७ | ३१,६६,९७१.५० | ०.२१ |
| ७ | वस्तुतारण | ३१,६७,७३२.५० | २,६४,४४३.५० | ०.०२ |
| ८ | ठेवतारण | ९,३४,९६,३४९.८५ | ०.०० | ०.०० |
| ९ | नॅशनल सेव्हिंग्ज सर्टि. | २२,२६६.०० | ०.०० | ०.०० |
| १० | विमा पॉलिसी | ७,३२,६७७.०० | ०.०० | ०.०० |
| ११ | सोनेतारण मुदत कर्ज | ३,७५,७३,९६३.०० | ३,३५,५१०.०० | ०.०३ |
| १२ | कर्मचारी कर्ज | ३४,३१,५७५.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण | १,०५,२१,५०,५९२.०४ | २,२५,८८,१०४.२० | १.५१ |

## लवाद दावे प्रकरणे माहिती खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | तपशील | दावे | रक्कम लाखात |
|---|---|---|---|
| १ | आरंभी शिल्लक | ४३ | ७०.९८ |
| २ | नवीन प्रकरणे | १० | १९.९३ |
| ३ | या वर्षातील वसुली | १२ | ४.३४ |
| ४ | शिल्लक दावे | ४१ | ८६.५७ |

❖ शतक महोत्सवी ठेव कालावधी १ वर्ष : व्याजदर ७.००% ❖

## नफा विभागणी

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६0 तरतूदीस अनुसरून अहवाल सालामध्ये बँकेला एकूण ढोबळ नफा रु.४,३९,९६,७८८.७० इतका झाला असून त्यामधून पुढीलप्रमाणे तरतूदींना संचालक मंडळाने मंजूरी दिली आहे.

### 'तरतूदी'

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | शिल्लक रजा निधी | ११,00,000.00 |
| २ | ऑडिट फी | ८,00,000.00 |
| ३ | बोनस/इन्सेंटिव्ह | २५,00,000.00 |
| ४ | उत्तम जिंदगी | ७,00,000.00 |
| ५ | संशयीत बुडित कर्ज निधी | ६५,00,000.00 |
| ६ | देणे पगार तफावत | १0,00,000.00 |
| ७ | कोव्हीड-१९ नियामक योजना | ३,३४,000.00 |
| ८ | आयकर | १,0८,८९,८८५.00 |
| | एकूण | २,३८,२३,८८५.00 |

वरीलप्रमाणे आवश्यक त्या तरतूदी केल्यानंतर निव्वळ नफा रु.२,0१,७२,९0३.७0 झाला असून नफ्याची विभागणी संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे त्यास स्विकृती द्यावी.

### 'नफा विभागणी'

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | राखीव निधी २५% | ५0,४३,२२६.00 |
| २ | लाभांश समिकरण निधी २% | ४,0३,४५८.00 |
| ३ | कोव्हीड-१९ नियामक निधी | २0,१७,२९0.00 |
| ४ | धर्मादाय निधी १% | २,0१,७२९.00 |
| ५ | शतक महोत्सवी निधी | ५,00,000.00 |
| ६ | निवडणूक निधी | २,00,000.00 |
| ७ | सभासद कल्याण निधी | १,00,000.00 |
| ८ | कर्मचारी/संचालक/सभासद प्रशिक्षण निधी | १,0७,000.00 |
| ९ | गुंतवणूक चढ-उतार निधी | ३५,५0,000.00 |
| १0 | इमारत निधी | २0,५0,१६0.00 |
| ११ | शिल्लक नफा | ६0,00,0४0.७0 |
| | एकूण | २,0१,७२,९0३.७0 |

❖ शतक महोत्सवी दामदुप्पट ठेव कालावधी ११२ महिने ❖

## लाभांश

महाराष्ट्र सहकारी कायद्यातील तरतूदीप्रमाणे तसेच रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचना, आपल्या व बँकेच्या भविष्यातील योजना विचारात घेऊन संचालक मंडळाने सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी ११% दराने लाभांश देण्याचे प्रस्तावित होते. रिझर्व्ह बँकेकडील परिपत्रक क्र. DOR.BP.BC.No.64/21.02.067/2019-20 Dt.17/04/2020 नुसार लाभांश वाटप संबंधित दि.३१/०३/२०२० च्या नफ्यामधून भविष्यकाळात बँकेच्या ताळेबंदावर ताण पडू नये याकरीता दि. ३१ मार्च २०२०च्या वर्षाचे लाभांशाचे वाटप सभासदांना करू नये असे या परिपत्रकाद्वारे रिझर्व्ह बँकेने निर्देश दिले होते. तद्नंतर रिझर्व्ह बँकेकडील परिपत्रक क्र. DOR.BP.BC.No.29/21.02.067/2020-21 Dt.04/12/2020 च्या परिपत्रकानुसार लाभांश तरतूदीकरीता मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे बँकेला तरतूद करावी लागणारी लाभांशाची रक्कम बँकेची आर्थिक स्थिती उत्तम असतानाही सभासदांना त्याचा लाभ देणे आर्थिक वर्षी अशक्य झाले आहे. तरीही दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स फेडरेशन लि., मुंबई व दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप.बँक्स असो.लि., मुंबई यांचे मार्फत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे ज्या बँकांची आर्थिक स्थिती उत्तम आहे अशा बँकांना लाभांश वाटपासाठी अनुमती द्यावी अशा विनंतीसह मागणी करण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

## आधुनिक तंत्रज्ञान

बँक ही आपल्या जीवनाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. खरंतर बँकिंग हे जीवनावश्यक वस्तूंमध्ये येते. कारण आपले कोणतेही फायनान्शियल प्लॅनिंग हे आपण बँकेशिवाय करूच शकत नाही अशी आताची व्यवस्था आहे. मोबाईल बँकिंगच्या माध्यमातून ग्राहक आता कुठूनही आपले बँकीग व्यवहार करू शकतो. त्याला वेळेची कोणतीही मर्यादा राहिली नाही. इंटरनेट बँकिंगच्या माध्यमातून बँक आणि ग्राहक एकत्र आलेले आहेत. ग्राहकाला इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन बँकींग करून घरबसल्या किंवा आपल्या ऑफिसमधूनही खरेदी-विक्रीसारखे व्यवहार करता येतात. ग्राहक आपली रक्कम एकीकडून दुसरीकडे वर्ग करू शकतो. आपल्या खात्यातून रक्कम वर्ग करणे, चेकबुकची मागणी करणे, खाते उतारा पाहणे, आपल्या खातेवरील जमा व नावे पडलेल्या रक्कमांची माहिती घेणे इ. माहिती त्याला आता आधुनिक बँकींगच्या माध्यमातून सहज उपलब्ध झाली आहे. खात्यावरील कोणत्याही व्यवहाराचे मेसेज त्याला क्षणात मोबाईलवर येतात.

खातेदाराला पूर्वी बँकेत जावून, रांगेत उभे राहून रक्कम घ्यावी लागत होती. पण आता तो एटीएममुळे देशभरात कोठेही रक्कम काढू शकतो. इंटरनेटच्या माध्यमातून आरटीजीएस, एनईएफटी सारख्या सुविधा त्याला मिळाल्या आहेत. केवळ बोटाच्या एका क्लिकवर तो आपल्या बँकेशी संपर्क साधू शकतो. बँकेविषयी सर्व ती माहिती मिळवू शकतो. ग्राहकाला आता आपल्या खात्याचा उतारा मागण्यासाठी किंवा पासबुक भरण्यासाठी बँकेत काऊंटरवर हेलपाटे मारण्याची आवश्यकता नाही.

नव-नवे तंत्रज्ञान बँकेने आणले तरी आपले ब्रिद वाक्यानुसार सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याची व आपुलकीची बँक म्हणून बँकेचा कर्मचारी वर्ग आधुनिक बँकिंग पध्दतीमध्ये परिपूर्ण झालेला असून बँकिंग अर्थव्यवस्था विविध सेवा-सुविधांच्या माध्यमातून प्रगतीपथावर नेण्यास सज्ज आहे.

## अंतर्गत नियंत्रण

आज बँकांपुढे अनेक यक्ष प्रश्न व कठीण आव्हाने उभी ठाकलेली आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर सर्वसाधारण ग्राहक वर्ग व ठेवीदार यांचे हित डोळ्यासमोर ठेऊन बँकेला पुढे वाटचाल करावयाची असते आणि त्या करीता नवनीवन प्रयोग करत आपल्या ग्राहकांना सेवा देण्याच्या प्रक्रियेमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणून कार्यपध्दती अवलंबिणे महत्त्वाचे ठरते. ठेवीदारांच्या मनात विश्वासाचा अंकूर रुजविणे व त्यांचा विश्वास कायम जोपासणे याकरीता कर्मचारी वर्गांसमवेत बँकेची असलेली कार्यप्रणाली पूर्णपणे

अभेद्य आहे. बँकेकडून सर्वच ग्राहकांना सेवा-सुविधा देताना बँकेमधील कामकाजाची पध्दत व व्यवस्थापन अतिशय सुरळीत पध्दतीने चालणेकरीता तत्पर व दूरदृष्टीने निर्णय घेण्याची प्रक्रिया नि:पक्षपातीपणे करण्याची पध्दत अवलंबविली जात असल्याने कर्मचारी वर्ग, संचालक मंडळ ही रथाची दोन चाके समान राहील्यानेच बँकेची नेत्रदिपक प्रगती होत असताना दिसून येत आहे.

बँकेचा कर्ज पुरवठा उत्पादक स्वरुपाचा रहावा यासाठी रिझर्व्ह बँक यांनी बँकिंग व्यवसायातील जोखीमा ओळखून सदर जोखीमा कमी करण्यासाठी जोखीम व्यवस्थापन धोरण अवलंबणेबाबत मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. त्याप्रमाणे बँकेच्या व्यवहारातील विविध प्रकारच्या जोखीमा शोधून त्या कमी करण्यासाठी बँकेचे लेखापरिक्षण व अंतर्गत तपासणी विभागात सक्षम व अनुभवी अधिकाऱ्यांचा समावेश केला आहे. मुख्य कार्यालय व दहा शाखांमध्ये अनुभवी चार्टर्ड अकाऊंटंट्सद्वारे सतत व समवर्ती लेखापरिक्षण केले जात आहे. संचालक मंडळाची लेखापरिक्षण समिती सातत्याने प्रयत्नशील आहे. आपल्या बँकेची माहिती व तंत्रज्ञान संबंधीत लेखापरिक्षण (आय.एस.ऑडिट) आय.टी. क्षेत्रातील विविध धोके टाळण्यासाठी व माहिती तंत्रज्ञानाच्या चांगल्या व्यवस्थापनासाठी बँकेने सायबर सिक्युरिटी सेल स्वतंत्ररित्या केलेला असून, आधुनिक तंत्रप्रणाली अधिकाधिक सुरक्षित करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व पाऊले उचललेली असून बँकेच्या जोखीमा कमी करण्याचा प्रयास करण्यात आलेला आहे.

## आंतरराष्ट्रीय दर्जा प्रमाण पत्र (ISO : 9001-2015 मानांकन)

बँकेचे दैनंदिन बँकिंग कामाचे मुल्यमापन 'क्वालिटी मॅनेजमेंट सिस्टीम' बाबत गेले ४ वर्षे सातत्याने मुख्य कार्यालयासह सर्व शाखांचे आय.एस.ओ. ऑडिट टी.यु.व्ही. इंडिया प्रा.लि. या कंपनीने केलेले असून गुणवत्ता धोरण उत्तम पध्दतीने राहण्याच्या उद्देशाने ऑडिटमध्ये प्रामुख्याने बँकेच्या विविध ग्राहक सेवा, कर्ज व ठेव योजना, इतर दैनंदिन बँकिंग व्यवहार कोणत्या पध्दतीने होत असतात यासाठी निश्चित केलेली कार्यपध्दती सर्व शाखांमधून एकसारखे पणाने व नियमीतपणे होते का ? तसेच मुख्यकार्यालयाकडून पाठविण्यात येणाऱ्या सूचनांचे सर्व शाखा पातळींवरचे नियोजन व कार्यपध्दती इत्यादीची पहाणी केली जाते. या तपासणीमध्ये बँकेमार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधांची माहिती ग्राहकांकडूनसुध्दा खातरजमा करून घेतल्या नंतरच आय.एस.ओ. मानांकन ISO : 9001-2015 हे आंतरराष्ट्रीय दर्जा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यामुळे बँकेने आपला गुणवत्ता दर्जा उत्तम राखला आहे व रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार आर्थिकदृष्ट्या सक्षम बँकिंग सेवा बँक देत असल्याबाबतचा निर्वाळा या प्रमाणपत्रामध्ये असल्याने याचा सार्थ अभिमान आहे.

## लेखापरिक्षण व तपासणी

सन २०१९-२० या संपलेल्या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण (Statutory Audit) श्री.निलेश नंदकुमार पाटणकर - चार्टर्ड अकाऊंटंट, राजापूर यांनी केले असून गेल्या अनेक वर्षांप्रमाणे आपल्या बँकेला या ही वर्षी ऑडिट वर्ग **'अ'** मिळाला आहे. तसेच रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार बँकेचे आर्थिक वर्ष २०१९-२० साठी सतत व समावर्ती लेखापरिक्षण श्री.साईप्रसाद एस.शेट्ये ॲण्ड कंपनी - चार्टर्ड अकाऊंटंट, खारेपाटण, रत्नागिरी व बी.पी.ओसवाल ॲण्ड कंपनी - चार्टर्ड अकाऊंटंट, रत्नागिरी यांनी केले आहे. तसेच संगणक कार्यप्रणाली लेखापरिक्षण ल्युमिव्हंस सोल्युशन प्रा.लि., नाशिकचे श्री.अमर ठाकरे यांनी केले आहे.

बँकेचे मा.वैधानिक लेखापरिक्षक, मा.अंतर्गत लेखापरिक्षक यांनी बँकेच्या कामकाजाबद्दल बँकेच्या आर्थिक व सांपत्तिक स्थिती पाहता बँकेची होत असलेली प्रगती व घोडदौड याबद्दल समाधान व्यक्त करून कोव्हीड-१९च्या कार्यकालात बँकेने दैदिप्यमान यश संपादन केल्याबद्दल प्रशंसोद्‌गार व्यक्त केले.

❖ कॅश-क्रेडिट कर्ज ❖

## संचालक मंडळ

या बँकेचे संचालक मंडळ एक दिलाने एक मताने कठोर परिश्रम, दृढ निश्चय व सर्वात महत्वाचे म्हणजे कामाशी असलेली घट्ट बांधिलकी यामुळे बँकिंग कामकाज एक निष्ठतेने आणि जिद्दीने करीत असल्याने बँकेच्या व्यवस्थेवर त्यांच्या अलौकिक बुध्दीमत्ता, समंजस विचार, साहस व परमार्थी वृत्तीमुळे बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी ध्येय-धोरणे निश्चित केल्याने आजची बँकेची प्रगती ही गरुडझेपेसारखी उंचावत आहे आणि याचीच पोहोचपावती म्हणून बँकेने अनेक पुरस्कारांवर मोहर उमटविली आहे. अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण २५ सभा झाल्या आहेत. या व्यतिरिक्त सर्व समितींच्या एकूण ३९ सभा झालेल्या आहेत. मा.संचालकांनी नियोजनबद्ध कामकाज पार पाडण्यास मदत केली आहे. त्यांच्या या सहकार्याबद्दल मी आभारी आहे. अहवाल वर्षात अध्यक्षपदाची धुरा मी व उपाध्यक्ष पदाची धुरा श्री.सुनिल भिकाजी जाधव हे सांभाळीत आहोत.

## कर्मचारी वर्ग

बँकेतील अधिकारी तसेच सर्व कर्मचारी हे अनुभव आणि कौशल्य यांचे आचरण करत काम करताना दैनंदिन कामकाजाची माहिती सतत होणाऱ्या बदलांचे अद्ययावत ज्ञान, कामात अचूकता व हुशारी याच बरोबर बँकिंग हे एक सेवा क्षेत्र असल्यामुळे येथे ग्राहकांशी व्यवहार करताना त्याचं संपूर्ण समाधान कसे होईल याचा विचार करून चतुरपणे व योग्य प्रशिक्षणाची जोड घेऊन व्यवसाय वृध्दीच्या वेगात सहभागी असल्याने बँकेच्या नेत्रदिपक प्रगतीत त्यांचा मोलाचा/सिंहाचा वाटा आहे असे मी आवर्जुन नमूद करू इच्छितो. कर्मचाऱ्यांचे मार्फत आपुलकीची व जिव्हाळ्याची ग्राहक सेवा देण्यासाठी बँक नेहमीच प्रयत्नशील असते. संचालक मंडळ व बँक प्रशासन यांनी दूरदृष्टीने नेमून दिलेले कामकाज अधिकारी, कर्मचारी यांनी सांघिक पध्दतीने केल्याने बँकेच्या व्यवसायाची  प्रगती राखण्यात यशस्वीता लाभली आहे. कर्मचाऱ्यांची सुरक्षितता, सुखसोयी व प्रगती यासाठी बँक सदैव प्रयत्नशील असते. प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांना बँकिंग क्षेत्रातील नवीन बदल व लागू होणारे निकष, कायदे यांचे सखोल ज्ञान प्राप्त होत असल्याने बँकेने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी वेळोवेळी प्रशिक्षण कार्यक्रम राबवून प्रशिक्षीत सेवक वर्ग निर्माण केला आहे.

## शताब्दी वर्ष

दि. ०१ ऑक्टोबर २०२० रोजी आपल्या बँकेने शताब्दी वर्षात पदार्पण केले आहे व पदार्पण सोहळ्याची सुरुवात मा.जिल्हा उपनिबंधक श्री.अशोक गार्डीसाहेब व महनीय व्यक्ती यांच्या उपस्थितीत कोव्हीड-१९ या विषाणूच्या वाढत्या संसर्गामुळे व शासनाच्या उपस्थिती बंधनामुळे छोटेखानी परंतू दिमाखदार असा सोहळा साजरा करण्यात आला. हे शताब्दी वर्ष बँकेच्या इतिहासात अतिशय अभिमानाची बाब म्हणून गणले जात आहे.

सप्टेंबर २०२१ अखेर साजरा होणारा शताब्दी वर्ष सांगता समारंभ देखील अविस्मरणीय असा करण्याचे नियोजन करणेत आले आहे. शताब्दी वर्षात वेगवेगळ्या कार्यक्रम व योजनांच्या माध्यमातून बँकेचे ग्राहक व सभासद यांना सेवा-सुविधांसमवेत जागृतीच्या उद्देशाने उपक्रम राबविणेचे नियोजित केले आहे. सन २०२१ या शताब्दी वर्षाकरीता बँकेने ग्राहक व सभासदांकरीता दिनदर्शिका भेट म्हणून वितरीत केली आहे.

## भावपूर्ण श्रद्धांजली

